Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक १३२ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

पिण्याच्या पाण्यासाठी चिमुकल्यांचा ग्रामपंचायतीवर मोर्चा

(पान २ वर)



## शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात ठाकरे गटाचा युक्तिवाद पूर्ण

# धनुष्यबाण चिन्ह तातडीने गोठवा!

## 'विधिमंडळ पक्ष म्हणजे राजकीय पक्ष नव्हे', सिब्बल यांचा जोरदार युक्तिवाद

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली/मुंबई । शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी गुरुवारी सुप्रीम कोर्टात आपला युक्तिवाद पूर्ण केला. युक्तिवादाच्या शेवटी सिब्बल यांनी शिवसेनेचे 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्ह तातडीने गोठवावे, अशी महत्त्वाची मागणी न्यायालयासमोर केली.**

त्यामुळे या बहुचर्चित प्रकरणाच्या सुनावणीत नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदारांच्या अपात्रतेबाबत दिलेल्या निकालाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. ठाकरे गटाच्या वतीने कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद करताना पक्षाचे नेतृत्व, विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्षातील फरक, पक्षांतरबंदी कायदा तसेच धनुष्यबाण चिन्हाच्या वापराचा मुद्दा न्यायालयासमोर मांडला. कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद करताना




सांगितले की, राजकीय पक्षाची नोंद निवडणूक आयोगाकडे असते. विधिमंडळ पक्ष म्हणजे राजकीय पक्ष नव्हे, असा दावा त्यांनी केला. आमदार निवडून आल्यानंतर अस्तित्वात येणारा विधिमंडळ पक्ष हा राजकीय पक्षापेक्षा वेगळा असतो. त्यामुळे केवळ आमदारांच्या संख्येच्या आधारे संपूर्ण राजकीय पक्षावर दावा करता येणार नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. "आमदार आहोत म्हणून आम्हीच पक्ष आहोत, हा शिंदे गटाचा दावा तकलादू आहे. विधिमंडळ पक्ष हा तात्पुरत्या स्वरूपाचा असतो," असे सिब्बल यांनी न्यायालयात मांडले. विधानसभा अध्यक्षांनी कोणताही पुरेसा विचार न करता शिंदे गटाला पक्षाचे नाव आणि चिन्ह दिल्याचा आरोप सिब्बल यांनी केला. राजकीय पक्षाचे नेतृत्व कोणाकडे आहे, याची नोंद निवडणूक आयोगाकडे स्पष्ट असताना विधानसभा अध्यक्ष दहाव्या अनुसूचीच्या चौकटीबाहेर कसे जाऊ शकतात, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. उद्धव ठाकरे हे पक्षाच्या नेत्यांनी निवडलेले पक्षप्रमुख होते. पक्षात फूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी अजय चौधरी यांची गटनेतेपदी केलेली निवड कायदेशीर होती, असा दावा सिब्बल यांनी केला. अजय चौधरी यांच्या पत्रावर उद्धव ठाकरे यांची पक्षप्रमुख म्हणून स्वाक्षरी असल्याने त्यावर शंका घेण्याचे कारण नसल्याचेही त्यांनी सांगितले. शिंदे गटाने बंड केल्यानंतर अजय चौधरी यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली होती.

### दहाव्या अनुसूचीचा वापर नको'

"सत्तेतील पक्षाने विरोधी पक्षासोबत सत्ता स्थापन करण्याचा प्रकार झाला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले, पण ते कोणत्या राजकीय पक्षातून मुख्यमंत्री झाले?" असा सवाल सिब्बल यांनी उपस्थित केला. "फुटीला प्रोत्साहन देण्यासाठी दहाव्या अनुसूचीचा गैरवापर होऊ देऊ नका. शिवसेना हा उद्धव ठाकरेंचा पक्ष आहे," असा ठाम दावा त्यांनी केला. सिब्बल यांनी आपला युक्तिवाद पूर्ण करताना धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याची मागणी केल्याने आता सुप्रीम कोर्ट या मुद्द्यावर काय भूमिका घेते, याकडे महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

---

Selected

### फडणवीस आणि शिंदेमुळेच उपोषणाची वेळ

**मुंबई :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज महत्वाची माहिती दिली आहे. येत्या 29 ऑगस्टपासून सुरु होणारं उपोषण अंतरवाली सराटीतच करणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. मात्र प्रश्न जर निकाली नाही लागला तर उपोषण सुरु असतानाच मुंबईला देखील जाणार असल्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र शिंदेयांच्यावर टीका केली आहे. या दोघांमुळेच उपोषणाची वेळ आल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी 29 ऑगस्पासून सुरु होणारं उपोषण अंतरवाली सराटीतच होणार असल्याचं सांगितलं. यावेळी त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली.

---

## हज्जन सायरा बानो गर्ल्स उर्दू शाळेत 'संविधान व मानसिक स्वास्थ्य' कार्यक्रम!

जन सम्राट टाईम्स

**धुळे | (प्रतिनिधी):** धुळे शहरातील हज्जन सायरा बानो गर्ल्स उर्दू मीडियम हायस्कूल येथे बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी 'संविधान व मानसिक स्वास्थ्य' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पेट्रोलिंगदरम्यान उपस्थित असलेल्या दामिनी पथकाने विद्यार्थिनींना सायबर सुरक्षा, महिला सुरक्षा आणि सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन केले. दामिनी पथकाच्या वतीने सायबर क्राइम, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षा आणि सायबर बुलिंग यांसारख्या विषयांवर विद्यार्थिनींमध्ये जनजागृती करण्यात आली. सायबर सुरक्षेबाबत महत्त्वाचे मार्गदर्शन यावेळी विद्यार्थिनींना इंटरनेट किंवा मोबाइलच्या माध्यमातून होणाऱ्या विविध सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. बनावट फोन कॉल, संदेश किंवा संशयास्पद लिंकच्या माध्यमातून होणाऱ्या ऑनलाइन फसवणुकीपासून



सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच OTP, PIN, पासवर्ड, बँक खात्याची माहिती अथवा अन्य गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले. सोशल मीडिया वापरताना फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या माध्यमांवर वैयक्तिक माहिती, छायाचित्रे किंवा संवेदनशील तपशील विचारपूर्वक शेअर करण्याचा सल्ला विद्यार्थिनींना देण्यात आला. अनोळखी लिंक किंवा संशयास्पद वेबसाइटवर क्लिक करू नये, असेही सांगण्यात आले. ऑनलाइन माध्यमातून कोणाला त्रास देणे, धमकावणे किंवा अपमानित करणे म्हणजे सायबर बुलिंग असून, अशा प्रकाराला बळी पडल्यास गप्प न राहता पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तीला तातडीने माहिती द्यावी, असे मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्हा घडल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता कुटुंबीय, शिक्षक किंवा पोलिसांची तातडीने मदत घ्यावी, असा संदेशही विद्यार्थिनींना देण्यात आला. या कार्यक्रमात मृणालिनी सुनील भावसार यांनी सायबर क्राइम, दामिनी पथकाची भूमिका आणि महिला सुरक्षेबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमातून विद्यार्थिनींमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

---

## यावलमध्येपरिसरातील जिवंत झाडांची बेकायदेशीर कत्तल

जन सम्राट टाईम्स

**यावल| प्रतिनिधी:** यावल शहरातील गंगानगर गार्डन परिसरातील जिवंत व हिरवीगार झाडे बेकायदेशीरपणे तोडण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या अवैध वृक्षतोडीची तात्काळ चौकशी करून घटनास्थळाचा पंचनामा करावा तसेच संबंधित दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेविका सौ. वर्षा चोपडे यांनी यावल नगरपालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे. पर्यावरणाची हानी; नागरिकांमध्ये संताप शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणासोबतच अस्तित्वात असलेल्या झाडांचे संगोपन व संरक्षण करणे आवश्यक आहे. मात्र, गंगानगर गार्डन परिसरातील सार्वजनिक जागेवरील चांगली व जिवंत झाडे कोणतीही परवानगी न घेता तोडण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरिक तसेच पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी व्यक्त होत असून, सार्वजनिक परिसरातील झाडांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. नगरसेविका वर्षा चोपडे यांच्या प्रमुख मागण्या घटनास्थळाचा तात्काळ पंचनामा करावा : नगरपालिका प्रशासनाने गंगानगर गार्डन परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून तोडण्यात आलेल्या झाडांचा पंचनामा करावा. दोषींवर कडक कारवाई करावी : विनापरवाना वृक्षतोड करणाऱ्यांसह या प्रकाराला जबाबदार असलेल्या व्यक्तींवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करावी. झाडांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना कराव्यात : गंगानगर गार्डन व सार्वजनिक परिसरातील वृक्षांच्या संरक्षणासाठी नगरपालिका प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेविका वर्षा चोपडे यांनी केली आहे. कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

---

### मतदार यादीत नाव टाकायचे पैसे द्या!

**परभणी | प्रतिनिधी :** परभणी विधानसभा मतदारसंघात BLO म्हणून काम करत असलेले रामेश्वर काळे हे SIR फॉर्म अंतर्गत 2002 च्या मतदार यादीत नाव नसल्याने मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी एका कुटुंबाला 2500 रुपयांची लाच मागितली. मात्र सदर कुटुंबाने बीएलओने अडीच हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार एसीबीकडे केली. या तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. त्यानंतर परभणी शहरातील बालाजी भोजनालय स्टेशन रोड परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी आरोपी रामेश्वर काळे याने तक्रारदाराकडून दोन हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारली.

---

## निभोरा पोलिसांकडून मोटारसायकल चोरीचा गुन्हा उखडकीस

### खर्डी बुद्रुक येथून चोरीला गेलेली दुचाकी पोलिसांनी केली हस्तगत

जन सम्राट टाईम्स

**रावेर | प्रतिनिधी :** रावेर तालुक्यातील खर्डी बुद्रुक येथील हॉटेल व्यावसायिकाची घरासमोर उभी केलेली दुचाकी चोरीला गेल्याच्या प्रकरणाचा निभोरा पोलिसांनी छडा लावला आहे. पोलिसांनी संशयित आरोपीला ताब्यात घेत चोरीला गेलेली सुमारे ७० हजार रुपये किमतीची होंडा युनिकॉर्न मोटरसायकल हस्तगत केली आहे. खर्डी बुद्रुक येथील रहिवासी तथा हॉटेल व्यावसायिक प्रवीण रमेश जैस्वाल यांनी आपली होंडा



युनिकॉर्न मोटरसायकल (एमएच १९ ईएक्स २६८९) दि. २९ जुलै २०२६ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास घरासमोर उभी केली होती. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी मोटरसायकल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी जैस्वाल यांच्या तक्रारीवरून निभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संशयिताला ताब्यात घेताच गुन्ह्याची कबुली पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान करत किरण उर्फ गफूर पितांबर कोळी (रा. खर्डी बुद्रुक, ता. रावेर) याला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली असता त्याने दुचाकी चोरी केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर पोलिसांनी चोरीला गेलेली ७० हजार रुपये किमतीची होंडा युनिकॉर्न मोटरसायकल हस्तगत केली. पोलिसांच्या पथकाची कामगिरी ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक मीरा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस हेड कॉन्स्टेबल रिजवान पिंजारी, किरण चाटे, सुभाष शिंदे आणि सर्फराज तडवी यांच्या पथकाने तपास करून आरोपीला ताब्यात घेत दुचाकी हस्तगत केली. आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी पोलिसांनी आरोपी किरण उर्फ गफूर कोळी याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आणखी काही बाबी समोर येतात का, याचा तपास पोलीस करीत आहेत.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## मराठी न येणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाई सुरु

### व्यवसाय करताय तर मराठीचा सन्मान ठेवावाच लागेल : सरनाईकांचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल, पैसे कमवायचे असतील, तर मराठी संस्कृतीचा आणि अभिजात भाषेचा मान-सन्मान ठेवावाच लागेल, असा थेट आणि कडक इशारा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. 1989 च्या महाराष्ट्र मोटार वाहन नियमांचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी सर्व परप्रांतीय व स्थानिक वाहनचालकांना केले आहे. तसेच ज्यांना मराठी येणार नाही त्यांच्यावर 20 ऑगस्टपासून कारवाई सुरू होणार असल्याची माहितीही सरनाईकांनी दिली. महाराष्ट्र दिन ते स्वातंत्र्य दिन या 105 दिवसांच्या कालावधीत कोकण साहित्य परिषद आणि कोकण साहित्य ग्रंथालयाच्या माध्यमातून परप्रांतीय रिक्षाचालकांना मराठी




शिकवण्याची विशेष मोहीम राबवण्यात आली होती. ती यापुढेही सुरू ठेवणार असल्याचं प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं. परिवहन मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेअंतर्गत सुमारे 1 लाख 65 हजार 600 रिक्षा व टॅक्सी चालकांनी मराठी भाषेचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. हा उपक्रम पुढेही 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे' यांच्या नावाने सातत्याने सुरू ठेवण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत. ज्या चालकांना अजूनही मराठी शिकायचे आहे, त्यांच्यासाठी ही सोय उपलब्ध असणार आहे.

परिवहन विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार गुरुवारपासून (20 ऑगस्ट) ज्या रिक्षा किंवा टॅक्सी चालकाला मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान नसेल किंवा मराठी बोलता येत नसेल, त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.सरनाईक यांनी स्पष्ट केले की, "कोणाचीही रोजीरोटी हिसकावून घेणे हा आमचा किंवा आमच्या शिवसैनिकांचा उद्देश नाही. विविध राज्यांतून आलेल्या लोकांचे आम्ही स्वागतच करतो, त्यांनी इथे यावे आणि व्यवसाय करावा, परंतु महाराष्ट्रात राहताना मराठी भाषेचा मान-सन्मान राखणे बंधनकारक आहे." प्रत्येक वाहनचालकाला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. मराठी न येणाऱ्या चालकांना प्रथम नोटीस बजावली जाईल आणि तरीही सुधारणा न झाल्यास त्यांच्यावर नियमानुसार कडक कारवाई केली जाईल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं.महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल, पैसे कमवायचे असतील, तर मराठी संस्कृतीचा आणि अभिजात भाषेचा मान-सन्मान ठेवावाच लागेल, असा थेट आणि कडक इशारा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. 1989 च्या महाराष्ट्र मोटार वाहन नियमांचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी सर्व परप्रांतीय व स्थानिक वाहनचालकांना केले आहे. तसेच ज्यांना मराठी येणार नाही त्यांच्यावर 20 ऑगस्टपासून कारवाई सुरू होणार असल्याची माहितीही सरनाईकांनी दिली. साहित्य परिषद आणि कोकण साहित्य ग्रंथालयाच्या माध्यमातून परप्रांतीय रिक्षाचालकांना मराठी शिकवण्याची विशेष मोहीम राबवण्यात आली होती. ती यापुढेही सुरू ठेवणार असल्याचं प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं. परिवहन मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेअंतर्गत सुमारे 1 लाख 65 हजार 600 रिक्षा व टॅक्सी चालकांनी मराठी भाषेचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे.



# जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्ग अतिक्रमणमुक्त करण्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांचे निर्देश

## अतिक्रमण हटविण्यासाठी यंत्रणांनी मिशन मोडवर काम करावे; कारवाईपूर्वी संबंधितांना पूर्वसूचना

जन सम्राट टाईम्स

**परभणी | प्रतिनिधी:** ल्ह्यातील राष्ट्रीय आणि राज्य महामार्गालगतची अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत निश्चित कालमर्यादेत हटवावीत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी संबंधित यंत्रणांना दिले. अतिक्रमण हटविताना महसूल, पोलीस, उपप्रादेशिक परिवहन विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद तसेच संबंधित महामार्ग विभागांनी परस्पर समन्वय साधून मिशन मोडवर कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाने १३ जुलै २०२६ रोजी स्वतःहून दखल घेतलेल्या याचिका व रिट याचिकेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. महामार्गालगतचे अतिक्रमण हटविताना केवळ रस्त्याची डांबरी रुंदी गृहीत धरू नये. संबंधित महामार्गाची अधिकृत Right of Way (ROW),



मंजूर संरेखन, भूसंपादन अभिलेख, सीमांकन आणि प्रत्यक्ष हद्द यांची खातरजमा करावी, असे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी सांगितले. प्रत्येक ठिकाणी अतिक्रमणाचे डिमार्केशन करून महामार्गाची अधिकृत हद्द निश्चित करावी. आवश्यक ठिकाणी महसूल विभाग, महामार्ग विभाग आणि स्थानिक प्रशासनाच्या संयुक्त पथकाद्वारे मोजणी व सीमांकनाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी दिले. अतिक्रमणधारकांना नियमानुसार पूर्वसूचना देऊन निर्धारित कालावधीत अतिक्रमण स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन करावे. त्यानंतरही अतिक्रमण कायम राहिल्यास कायद्यानुसार निष्कासनाची कार्यवाही करावी. आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून घेण्यात यावा. कोणत्याही कारणामुळे कारवाईला विलंब होऊ नये, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील महामार्गांची अधिकृत हद्द व ROW रस्त्यानुसार वेगवेगळी असल्याने सरसकट निश्चित रुंदी गृहीत धरून अतिक्रमण हटवू नये, असे निर्देश देण्यात आले. त्यासाठी Final Land Acquisition Notification/Award, महसूल गाव नकाशा, मंजूर Alignment Plan, ROW Plan/Land Schedule, Chainage आणि Boundary Pillars तसेच संबंधित महामार्ग प्राधिकरणाच्या अद्ययावत संयुक्त मोजणीचा आधार घेण्याचे सांगण्यात आले. प्रत्येक महामार्गासाठी मार्ग, तालुका, गावनिहाय सुरुवात-शेवट, Existing व Design Chainage, लांबी, Carriageway, अधिकृत ROW, भूसंपादनाची स्थिती, संबंधित अधिसूचना, रस्त्याची मालकी असलेली यंत्रणा, संबंधित कार्यकारी अभियंता आणि अतिक्रमणाची सद्यस्थिती यांचा समावेश असलेला 'Parbhani District Highway Master Register–2026' तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले. राष्ट्रीय महामार्गांबरोबरच जिल्ह्यातील राज्य महामार्गांचेही स्वतंत्र सीमांकन आणि अतिक्रमण सर्वेक्षण करण्यात यावे. पाथरी, मानवत व परभणी तालुक्यांतील काही प्रमुख जिल्हा मार्गांचे राज्य महामार्गात उन्नतीकरण झाले असल्याने अद्ययावत PWD/UFID रेकॉर्डनुसार त्यांचाही अतिक्रमणमुक्तीच्या नियोजनात समावेश करावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांनी जालना–परभणी राष्ट्रीय महामार्गावर सध्या कोणतेही अतिक्रमण नसल्याची माहिती दिली. भविष्यातही महामार्गाच्या अधिकृत हद्दीत अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

परभणी शहरातील अनधिकृत अतिक्रमणे, रस्त्यांवरील अडथळे आणि वाहतुकीस अडचणी निर्माण करणाऱ्या बाबींवर महानगरपालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. संबंधित ठिकाणांची पाहणी करून अतिक्रमणधारकांना पूर्वसूचना द्यावी आणि निर्धारित कालावधीत अतिक्रमण न काढल्यास नियमानुसार निष्कासनाची कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले. पार्किंगच्या ठिकाणी निर्माण झालेले अनधिकृत अडथळे दूर करून वाहतुकीसाठी आवश्यक व्यवस्था करावी. तसेच शहरातील 'डार्क स्पॉट'ची पाहणी करून आवश्यक ठिकाणी प्रकाश व्यवस्था आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## युवतींनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी परिश्रम घ्यावेत

### विद्यार्थिनींच्या नेतृत्वगुणांना मिळणार



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** "महाविद्यालयीन जीवनातील युवती सभेचे व्यासपीठ हे विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे तसेच व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारे महत्त्वाचे माध्यम आहे. युवतींनी उज्ज्वल भविष्यासाठी मोठी स्वप्ने डोळ्यासमोर ठेवून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी," असे प्रतिपादन सेकंडरी एज्युकेशन सोसायटी, भालोदच्या चेअरमन सौ. हेमलताताई मुरलीधर इंगळे यांनी केले. येथील कला व विज्ञान महाविद्यालयातील युवती सभेच्या उद्‌घाटन समारंभात त्या उद्‌घाटक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कोल्हे होते. 'पाच स्व'चा अंगीकार करून जीवन विकसित करा यावेळी बोलताना हेमलताताई इंगळे म्हणाल्या की, स्वराष्ट्र, स्वधर्म, स्वसंस्कृती, स्वभाषा आणि स्वाभिमान या पाच 'स्व'चा अंगीकार करून विद्यार्थिनींनी आपले जीवन घडवावे. शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श नागरिक म्हणून समाजात आपले स्थान निर्माण करावे. चांगले विचार आणि चांगले संस्कार हे व्यक्तीला आनंदी व समृद्ध जीवन देतात, असेही त्यांनी सांगितले. युवती सभेतून सर्वांगीण विकासाला चालना अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. के. जी. कोल्हे यांनी युवती सभेचे महत्त्व अधोरेखित केले. युवती सभेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना परस्परांच्या विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळते. तसेच स्वाभिमानासोबतच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. विद्यार्थिनींनी या व्यासपीठाच्या माध्यमातून नेतृत्वगुण विकसित करून जीवनातील विविध आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जावे, असे आवाहन त्यांनी केले. आगामी उपक्रमांची माहिती कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवती सभाप्रमुख प्रा. डॉ. मीनाक्षी वाघुळदे यांनी केले. त्यांनी युवती सभेची उद्दिष्टे तसेच आगामी उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थिनींनी या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कु. हेमांगी इंगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. कु. हेमांगी महाजन यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. आशुतोष वर्डीकर, युवती सभा समिती सदस्या प्रा. सौ. मोहिनी तायडे, प्रा. सौ. गीतांजली चौधरी, प्रा. सौ. भावना प्रजापती, प्रा. जान्हवी परतणे, प्रा. फाल्गुनी राणे, प्रा. मानसी महाजन, प्रा. सौ. हंशाली महाजन यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

## मिथुन ढिवरे यांच्या रविवारी 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' पुस्तकाचे प्रकाशन!

### तुकाराम महाराजांच्या अभंगांचे निरूपणपर स्पष्टीकरण

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** येथील मिथुन ढिवरे यांच्या लेखणीतून साकारलेले 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' हे सहावे पुस्तक येत्या रविवारी, २३ ऑगस्ट २०२६ रोजी प्रकाशित होणार आहे. जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या निवडक अभंगांचे निरूपणपर स्पष्टीकरण या पुस्तकात करण्यात आले आहे. मिथुन ढिवरे यांच्या 'जनमाणसांतील तुकोबा भाग एक' या पुस्तकाचे प्रकाशन गेल्या वर्षी मार्च महिन्यात झाले होते. या पुस्तकाला मिळालेल्या प्रतिसादानंतर आता 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' वाचकांच्या भेटीला येत आहे. पुस्तक प्रकाशन सोहळा रविवार, २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत ऑर्बिट क्लासेस, गिरणा टाकी रोड, पोस्टल कॉलनीच्या मागे, लक्ष्मीनगर, जळगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन साहित्यिका अस्मिता मेश्राम 'पुष्पांजली', भंडारा यांच्या हस्ते होणार




आहे. कार्यक्रमास पुस्तकाची प्रस्तावना लिहिणारे ह.भ.प. दीपक महाराज पाटील शेळगावकर तसेच अथर्व पब्लिकेशन्सचे प्रकाशक युवराज माळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धांडे फाउंडेशनचे संचालक नेमीवंत धांडे सर राहणार आहेत. संत तुकाराम महाराजांच्या अभंगविचारांचा आणि भक्तिपर साहित्याचा वाचकांना परिचय करून देणाऱ्या या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास जळगाव जिल्ह्यातील तसेच शहरातील वाचक, साहित्यप्रेमी आणि पुस्तकप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लेखक तथा साहित्यिक मिथुन ढिवरे यांनी केले आहे. कार्यक्रमानंतर उपस्थितांना एक पुस्तक तसेच चहा व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे. येथील मिथुन ढिवरे यांच्या लेखणीतून साकारलेले 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' हे सहावे पुस्तक येत्या रविवारी, २३ ऑगस्ट २०२६ रोजी प्रकाशित होणार आहे. जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या निवडक अभंगांचे निरूपणपर स्पष्टीकरण या पुस्तकात करण्यात आले आहे. आता 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' वाचकांच्या भेटीला येत आहे. पुस्तक प्रकाशन सोहळा रविवार, २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत ऑर्बिट क्लासेस, गिरणा टाकी रोड, पोस्टल कॉलनीच्या मागे, लक्ष्मीनगर, जळगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. मेश्राम 'पुष्पांजली', भंडारा यांच्या हस्ते होणार आहे.

---

## पिण्याच्या पाण्यासाठी चिमुकल्यांचा ग्रामपंचायतीवर मोर्चा

### कापडणेत ठिय्या आंदोलन धनुर ते कापडणे तीन किलोमीटर पायपीट

जन सम्राट टाईम्स

**कापडणे, ता. धुळे। (प्रतिनिधी):** पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावरून धनुर जिल्हा परिषद शाळेतील चिमुकले विद्यार्थी आक्रमक झाले असून, त्यांनी थेट कापडणे ग्रामपंचायतीवर मोर्चा काढला. महापुरुषांच्या प्रतिमा हातात घेऊन विद्यार्थ्यांनी धनुर ते कापडणे अशी सुमारे तीन किलोमीटर पायपीट केली.

ग्रामपंचायत कार्यालयात अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित नसल्याने विद्यार्थी आणि पालकांनी ग्रामपंचायत आवारात ठिय्या आंदोलन सुरू केले. गेल्या अनेक वर्षांपासून धनुर जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

पाण्याच्या प्रश्नाबाबत अनेक वेळा तक्रारी करूनही तो सोडविण्यात आला नसल्याने अखेर विद्यार्थ्यांनीच आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. महापुरुषांच्या प्रतिमा हातात



घेऊन तीन किलोमीटर पायपीट पिण्याच्या पाण्याच्या मागणीसाठी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या प्रतिमा हातात घेत धनुर येथून कापडणे ग्रामपंचायतीपर्यंत मोर्चा काढला. सुमारे तीन किलोमीटर अंतर पायी चालत विद्यार्थी ग्रामपंचायतीच्या आवारात पोहोचले.

मात्र, आंदोलनस्थळी ग्रामपंचायत प्रशासनातील अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित नसल्याने विद्यार्थ्यांसह पालकांनी ग्रामपंचायत आवारात ठिय्या आंदोलन सुरू केले. दीड तासाहून अधिक काळ विद्यार्थी व पालक आंदोलनस्थळी बसून असल्याचे सांगण्यात आले. 'पाणी मिळेपर्यंत आंदोलन सुरूच' शाळेतील विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा म्हणून पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित असूनही प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने पालकांमध्येही तीव्र नाराजी आहे. "जोपर्यंत शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जात नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार," असा इशारा विद्यार्थी आणि पालकांनी प्रशासनाला दिला आहे. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी थेट ग्रामपंचायतीवर मोर्चा काढल्याने प्रशासन या प्रश्नाची कितपत दखल घेते आणि धनुर जिल्हा परिषद शाळेतील पिण्याच्या पाण्याची समस्या कधी सुटते, याकडे आता ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

---

## जि.प. सदस्या पुष्पाताई काळे यांची मंत्री मेघना बोर्डीकर व आदिती तटकरे यांची भेट!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी:** सोयगाव तालुक्यातील आरोग्य आणि पाणीपुरवठ्याच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जि.प. सदस्या सौ. पुष्पाताई काळे यांनी मुंबईतील मंत्रालयात राज्याच्या ऊर्जा, आरोग्य व पाणीपुरवठा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर तसेच महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सोयगाव तालुक्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासोबतच ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याशी संबंधित विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा केली. नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करत त्यांनी संबंधित मागण्यांचे निवेदन मंत्र्यांना सादर केले. आरोग्य सुविधांसह पाणीप्रश्न सोडविण्याची मागणी सोयगाव तालुक्यातील नागरिकांना पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, तसेच ग्रामीण भागातील पाणीपुरवठा सुरळीत व नियमित व्हावा, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तालुक्यातील विविध गावांमध्ये भेडसावणाऱ्या समस्या शासनाच्या निदर्शनास आणून देत त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्याची अपेक्षा पुष्पाताई काळे यांनी व्यक्त केली. मंत्रालयातील या भेटीमुळे सोयगाव तालुक्यातील आरोग्य व पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांना शासनस्तरावर चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

## स्वप्निल सोनवणे यांचा 'शिव छत्रपती महाराष्ट्र रत्न' पुरस्काराने होणार सन्मान

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव तालुक्यातील नंदगाव येथील युवा सामाजिक कार्यकर्ते तथा युवासेनेचे उपतालुका प्रमुख स्वप्निल सोनवणे यांना राज्यस्तरीय 'शिव छत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य या सामाजिक संघटनेच्या वतीने त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. पुणे येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. राजमाता माँ जिजाऊ स्वयंसहायता गट, जीवनदीप अनाथाश्रम व वृद्धाश्रम आणि तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि अन्य क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये जळगाव जिल्ह्यातून स्वप्निल सोनवणे यांची निवड झाली आहे. सामाजिक कार्याची घेतली दखल स्वप्निल सोनवणे यांनी गेल्या काही वर्षांत जळगाव ग्रामीण भागात सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक आणि राजकीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. सोनवणे यांनी युवासेनेच्या माध्यमातून



'माहेरची साडी' आणि 'नंदलक्ष्मी सुकन्या योजना' यांसारखे अभिनव उपक्रम स्वखर्चातून राबविले आहेत. तसेच नानाश्री फाउंडेशनच्या माध्यमातून वृद्धाश्रमात अन्नदान, बालसुधारगृहात संस्कारक्षम पुस्तकांचे वाटप, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, पर्यावरण जनजागृती, गरजू नागरिकांना उबदार कपड्यांचे वाटप आदी सामाजिक उपक्रम त्यांनी राबविले आहेत. विद्यार्थी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा विद्यार्थी संघटनेत कार्यरत असताना फीमाफीसह विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर न्याय व हक्कासाठी लढा देत त्यांनी प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. स्थानिक पातळीवर युवक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यांचा पाठपुरावा करण्याचे कामही त्यांनी केले आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासोबतच जळगाव ग्रामीणमधील विविध समस्या जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत त्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचेही सांगण्यात आले.

---

## लोकसहभागातून साहित्य भेट; योगदानकर्त्यांचा उत्साहात सत्कार

### बोरअंजटी आश्रमशाळेत क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक साहित्याचे वाटप

जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी :** बोरअंजटी, ता. चोपडा येथील धनाजी नाना चौधरी आदिवासी सेवा मंडळ, सत्रासेन संचलित अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक तसेच सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी लोकसहभागातून विविध साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. या निमित्ताने साहित्य भेट व योगदानकर्त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला उच्च माध्यमिक शिक्षक श्री. मुकेश बन्सीलाल पाटील यांनी आपल्या स्वर्गीय आई-वडिलांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांचे अतिरिक्त क्रीडा साहित्य भेट दिले. शाळेत यापूर्वी क्रीडा साहित्य उपलब्ध असतानाही विद्यार्थ्यांना नियमित सराव तसेच विविध स्पर्धांच्या तयारीसाठी अधिक सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने त्यांनी हे योगदान दिले. यासोबतच लोकसहभाग आणि माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने Mi-crotek कंपनीचे दोन इन्व्हर्टर, तीन सीलिंग पंखे, स्टीलचे



डेस्क-बेंच तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरणासोबतच क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांसाठीही अधिक चांगल्या सुविधा मिळणार आहेत. विद्यार्थ्यांच्या हितासाठी सामाजिक बांधिलकीतून केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल मुकेश बन्सीलाल पाटील यांचा शाळेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या योगदानाचे कौतुक करून पुढील सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रविंद्र रायसिंग भादले, सचिव ज्ञानेश्वर रायसिंग भादले, उपाध्यक्ष धनंजय रायसिंग भादले, संचालक जितेंद्र रायसिंग भादले, संचालक परमवीर रायसिंग भादले, माध्यमिक मुख्याध्यापक भगवान भालेराव व प्राथमिक मुख्याध्यापक जगदिश सिताराम महाजन यांचे मार्गदर्शन व पाठबळ लाभले. यावेळी उच्च माध्यमिक विभागातील प्रा. डॉ. गोपाल पाटील, प्रा. किरण महाजन, प्रा. विजय आखाडे, प्रा. ज्ञानेश्वर पाटील, प्रा. वासुदेव पवार, प्रा. मुकेश पाटील, प्रा. ज्ञानेश्वर पावरा, ज्येष्ठ माध्यमिक शिक्षक देवेंद्र पाटील, माध्यमिक शिक्षिका नेहा भादले, तसेच प्राथमिक व वसतिगृह विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. लोकसहभागातून शाळेला मिळालेल्या साहित्याचे उपस्थितांनी स्वागत करून सर्व योगदानकर्त्यांचे आभार मानले. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून समाजाच्या सहभागातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची घडण करणारे संस्कारकेंद्र आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# शिरपूर तालुक्यात गांजाच्या शेतीवर पोलिसांचा छापा

## ७.५० लाखांचा मुद्देमाल जप्त, एक आरोपी ताब्यात

जन सम्राट टाईम्स



**शिरपूर । प्रतिनिधी:** शिरपूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुनापाणी परिसरात वनविभागाच्या जमिनीवर कपाशीच्या पिकामध्ये आंतरपीक म्हणून गांजाची बेकायदेशीर लागवड केल्याचा प्रकार पोलिसांनी उघडकीस आणला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी बुधवार, दि. १९ ऑगस्ट रोजी दुपारी कारवाई करत सुमारे १५० किलो वजनाची गांजाची हिरवी झाडे जप्त केली असून, त्यांची अंदाजे किंमत ७ लाख ५० हजार रुपये आहे.

या कारवाईत विकास नकाराम पावरा याला ताब्यात घेण्यात आले असून, अन्य एक संशयित पोलिसांना पाहून फरार झाला. शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांना जुनापाणी परिसरात गांजाची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीनुसार त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिल्यानंतर छापा कारवाईस परवानगी घेण्यात आली. त्यानंतर दोन शासकीय पंच, वजनकाटाधारक, फोटोग्राफर आणि पोलीस पथकासह दुपारी साडे दोन वाजता संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. हा परिसर दुर्गम भागात असल्याने पोलिसांसमोरही कारवाईचे आव्हान होते. कपाशीच्या आंतरपिकात गांजाची लागवड पोलिसांच्या माहितीनुसार, राजाराम नकाराम पावरा आणि विकास नकाराम पावरा, दोघेही रा. जुनापाणी, ता. शिरपूर, जि. धुळे, यांनी वनविभागाच्या जमिनीवर कपाशीच्या पिकामध्ये प्रतिबंधित कॅनाबीस वनस्पतीची बेकायदेशीर लागवड केली होती.

छापा टाकला असता घटनास्थळी विकास नकाराम पावरा याला पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच अन्य एक संशयित घटनास्थळावरून पसार झाला. त्याचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. १५० किलो गांजाची हिरवी झाडे जप्त कारवाईदरम्यान पोलिसांनी मुळासह हिरवी, ओलसर आणि ताजी गांजाची झाडे जप्त केली. या झाडांना पाने, फुले आणि फांद्या होत्या. झाडांची उंची अंदाजे ३ ते ५ फूट असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. जप्त केलेल्या झाडांचे प्रत्येकी ३० किलो वजनाचे पाच गठ्ठे करण्यात आले. हे गठ्ठे कापडामध्ये भरून दोरीने बांधण्यात आले आणि सीलबंद करून त्यांना पी-१ ते पी-५ असे क्रमांक देण्यात आले. जप्त केलेल्या गांजाची एकूण किंमत सुमारे ७ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुनिल पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २३५/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यातील कलम ८(क), २०(अ)(i) आणि २८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज कचरे करीत आहेत. फरार संशयिताचा शोध घेण्यासह गांजाची लागवड नेमकी कोणत्या उद्देशाने करण्यात आली होती, याबाबतही तपास केला जात आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई धुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. शिरपूर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, पोलीस उपनिरीक्षक मनोज कचरे तसेच पोलीस अंमलदार संतोष पाटील, संदीप ठाकरे, स्वप्निल बांगर, विजय ढिवरे, संजय भोई, सुनिल पवार, दिनकर पवार, धनराज गोपाळ, मनोज नेरकर, अल्ताफ मिर्झा आणि इसरार फारुकी यांनी कारवाईत सहभाग घेतला. जुनापाणीच्या दुर्गम वनक्षेत्रात कपाशीच्या आंतरपिकात गांजाची लागवड आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली असून, या प्रकरणातील फरार संशयिताचा शोध घेण्याबरोबरच गांजा लागवडीमागील संपूर्ण साखळी उघड करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# मनपाच्या प्रवेशद्वारावरील गतिरोधकामुळे नागरिक संतप्त

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी :** धुळे महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर प्रशासनाने एकेरी वाहतूक सुलभ करण्याच्या उद्देशाने बसविलेल्या टोकदार गतिरोधकामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी समोर आल्या. वाहनचालकांचे टायर फुटण्यासह अपघाताचा धोका निर्माण होत असल्याने नागरिकांनी या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. नागरिकांचा वाढता रोष लक्षात घेऊन अखेर महानगरपालिका प्रशासनाने संबंधित गतिरोधकात तातडीने बदल केला. एकेरी वाहतुकीसाठी केला होता प्रयोग महानगरपालिकेत प्रवेश करणाऱ्या वाहनांना नेहमीच्या मार्गाऐवजी दुसऱ्या प्रवेशद्वारातून प्रवेश करता यावा आणि परिसरातील वाहतूक सुरळीत व्हावी, या उद्देशाने प्रशासनाने प्रवेशद्वारावर टोकदार स्वरूपाचे गतिरोधक व अडथळे बसविले होते. मात्र, या अडथळ्यांमुळे वाहनचालकांना त्रास होऊ लागला. विशेषतः टोकदार गतिरोधकामुळे काही वाहनांचे टायर फुटल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात आल्या. त्यामुळे वाहनचालकांसह महापालिकेत येणाऱ्या नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. नागरिकांच्या संतापानंतर प्रशासनाची कार्यवाही गतिरोधकामुळे निर्माण झालेल्या समस्यांबाबत नागरिकांनी आक्षेप घेत टोकदार गतिरोधक तातडीने हटविण्याची मागणी केली. नागरिकांचा वाढता रोष लक्षात घेऊन मनपा प्रशासनाने तत्काळ संबंधित गतिरोधकाच्या रचनेत बदल केला. गतिरोधकात बदल केल्यानंतर नागरिकांना होणारा त्रास कमी झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# धुरखेडे पुनर्वसनाचा प्रश्न पेटला; ३५ बाधित कुटुंबांचे आमरण उपोषण

## धोकादायक वास्तव्यातून मुक्तीची मागणी

जन सम्राट टाईम्स



**जळगाव/रावेर | प्रतिनिधी** रावेर तालुक्यातील मौजे धुरखेडे येथील ३५ बाधित कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रशासकीय दिरंगाईत अडकला असल्याने ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या मागणीसाठी १३ ऑगस्ट २०२६ पासून जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू करण्यात आलेले आमरण उपोषण सहाव्या दिवशीही सुरूच आहे. प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने उपोषणकर्ते व ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. जीव मुठीत धरून जगण्याची वेळ धुरखेडे येथील सध्याचे शासकीय भूखंड तापी नदीलगत असून परिसरात मोठे नाले व दऱ्या आहेत. पावसाळ्यात पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास या भागातील भूखंड पाण्याखाली जाण्याचा धोका असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गेल्या वर्षी २ सप्टेंबर २०२५ रोजी पावसाळ्यात घराची भिंत कोसळून ७२ वर्षीय पार्वताबाई भागवत अटकाळे यांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतरही पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी न लागल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्यातच पावसाळ्यात घरांमध्ये विषारी साप व विंचू आढळत असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून राहावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मोजणीच्या तारखा ठरल्या; मात्र प्रत्यक्ष कार्यवाही नाही ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, शासनाने खाजगी जमिनीचा सुधारित प्रस्ताव सन २०१८ मध्ये प्रस्ताव क्र. २३७/२०१८ अंतर्गत तयार केला होता. संबंधित भूखंडाच्या मोजणीसाठी १८ मार्च २०२५, १० मे २०२५, ४ जून २०२५ आणि ८ ऑगस्ट २०२२ अशा तारखा निश्चित करण्यात आल्याचे उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे. मात्र, या तारखांपैकी कोणत्याही वेळी प्रत्यक्ष मोजणीची कार्यवाही पूर्ण झाली नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न पुन्हा एकदा रखडल्याचे त्यांचे म्हणणे आहे. दीड महिना उलटूनही ठोस निर्णय नाही १८ जून २०२६ रोजी प्रशासनाला निवेदन देऊनही त्यावर ठोस कार्यवाही झाली नसल्याने अखेर ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले. १३ ऑगस्टपासून सलग सहा दिवस आंदोलन सुरू असून अद्याप ठोस तोडगा निघालेला नसल्याने उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीबाबतही चिंता व्यक्त होत आहे.

या मागण्यांवर ग्रामस्थ ठाम आहेत. 'अनुचित घटना घडल्यास प्रशासन जबाबदार' उपोषणादरम्यान कोणत्याही आंदोलकाच्या जीवाला धोका निर्माण झाल्यास किंवा कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा प्रशासन व जिल्हाधिकारी यांची राहील, असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

# शेतकरी संघटनेची भडगाव तालुका कार्यकारिणी जाहीर!

## अखिलेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली नवी कार्यकारिणी

जन सम्राट टाईम्स



**भडगाव । प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठीचा लढा अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने शेतकरी संघटनेची भडगाव तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. रविवार, १६ ऑगस्ट २०२६ रोजी शासकीय विश्रामगृह, भडगाव येथे झालेल्या बैठकीत तालुकाध्यक्ष अखिलेश रविंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यावेळी शेतकरी संघटनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष संदीप दादा पाटील, जिल्हा सरचिटणीस विनोद धनगर, चाळीसगाव तालुकाध्यक्ष दिलीप पाटील तसेच लोकमतचे पत्रकार अशोक परदेशी उपस्थित होते. तालुका कार्यकारिणीत पदाधिकाऱ्यांची नियुक्ती भडगाव तालुका कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी वाल्मीक प्रभाकर लोखंडे (बांबरुड प्र. उ.) व धनराज तुकाराम पाटील (पिचर्डे), तर कार्याध्यक्षपदी सतीश युवराज पाटील (गोंडगाव) यांची नियुक्ती करण्यात आली. सचिवपदी डॉ. योगेश युवराज गोसावी (वाडे) यांची, तर सरचिटणीसपदी सरदारसिंग जयसिंग पाटील (वडधे), समाधान भगवान पाटील (वाक) व रामकृष्ण जगन्नाथ माळी (वाडे) यांची निवड करण्यात आली. संघटकपदी संजय केशव खैरनार (बांबरुड प्र. उ.), तर चिटणीसपदी योगेश शालिक पाटील (बांबरुड प्र. उ.) व गणेश राजेंद्र जावरे (बात्सर) यांची नियुक्ती करण्यात आली. युवक आघाडीचीही कार्यकारिणी जाहीर शेतकरी संघटनेच्या युवक आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी लिलाधर कल्याणराव पाटील (वाक) यांची नियुक्ती करण्यात आली. उपाध्यक्षपदी सागर माधवराव पाटील (बांबरुड), सचिवपदी योगेश खुशाल पाटील (बात्सर), संघटकपदी विकी योगराज पाटील (वाक) तर सरचिटणीसपदी नरेंद्र संभाजी पाटील (वाक) यांची निवड करण्यात आली. याशिवाय ज्येष्ठ संघटकपदी संजय वेलजी पाटील (पिचर्डे) व प्रकाश कोतकर, तर सदस्यपदी जितेंद्र पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. शेतकरी प्रश्नांसाठी प्रभावी लढा उभारण्याचा निर्धार नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून भडगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे, पात्र शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, पीक नुकसान, अतिवृष्टी, विमा, नुकसानभरपाई आणि इतर शेतीविषयक प्रश्नांवर आवाज उठविणे, तसेच शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# इच्छादेवी चौफुलीवर मद्यपी वाहनचालकांची तपासणी

## श्रीकांत धिवरे यांच्या उपस्थितीत पोलिसांची कारवाई

जन सम्राट टाईम्स




**जळगाव। (प्रतिनिधी):** शहरातील इच्छादेवी चौफुली येथे बुधवारी, दि. १९ ऑगस्ट रोजी मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांविरोधात वाहतूक पोलिसांकडून तपासणी मोहीम राबविण्यात आली. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कारवाईमुळे वाहनचालकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली. यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस अधिकारी मोरेश्वर पेंडाम यांच्यासह पोलिसांचे पथक उपस्थित होते. शहरातील प्रमुख चौकांवर मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांवर लक्ष ठेवून ही तपासणी करण्यात आली. ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी तपासणीदरम्यान वाहनचालकांची ब्रेथ ॲनालायझरच्या माध्यमातून अल्कोहोलची तपासणी करण्यात आली.

उपलब्ध तपासणी पावतीनुसार सुनील रामप्रकाश यांच्या तपासणीत अल्कोहोलचे प्रमाण १००.८ mg/100mL नोंदविण्यात आले आहे. संबंधित वाहनाचा क्रमांक MH 19 EX 1963 असून, तपासणीची वेळ सकाळी १० वाजून ५९ मिनिटे २९ सेकंद अशी नोंदविण्यात आली आहे. अपघातांना आळा घालण्यासाठी पोलिसांची मोहीम मद्यप्राशन करून वाहन चालविल्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटून गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून शहरातील विविध ठिकाणी वाहनचालकांची तपासणी करण्यात येत आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांवर नियमानुसार कारवाई केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, 'मद्यप्राशन करून वाहन चालवू नका; स्वतःसोबतच इतरांच्या जीविताचीही काळजी घ्या,' असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षकांच्या उपस्थितीत झालेल्या या कारवाईमुळे मद्यपी वाहनचालकांचे धाबे दणाणले असून, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# माळेगाव पिंप्री अहवाल रखडला; तीन महिने उलटूनही अहवाल नाही

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव। प्रतिनिधी:** सोयगाव येथील ग्रामपंचायतीविरोधात करण्यात आलेल्या तक्रारीची चौकशी तीन महिने उलटूनही पूर्ण झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे पंचायत समिती प्रशासनाने चौकशी समिती गठित करताना अवघ्या सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, १९ ऑगस्ट २०२६ पर्यंतही चौकशी अहवाल सादर न झाल्याने या प्रकरणाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.तक्रारदार शिवराम दगडू जाधव, रा. माळेगाव पिंप्री यांच्या अर्जाच्या अनुषंगाने ही चौकशी समिती नियुक्त करण्यात आली. चौकशी समितीला देण्यात आलेल्या आदेशात 'सात दिवसांत अहवाल सादर करावा' असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते.

चौकशी समितीत तीन अधिकाऱ्यांचा समावेश या प्रकरणाच्या चौकशीसाठी पुढील तीन सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली होती : ए. एन. दौंड – सहायक गटविकास अधिकारी तथा प्रभारी विस्तार अधिकारी, पंचायत समिती सोयगाव – अध्यक्ष मोहन गिरी – कनिष्ठ अभियंता, उपविभाग पापु, सोयगाव – सदस्य अक्षय जाधव – स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, पंचायत समिती सोयगाव – सदस्य 'चौकशीला विलंब का?' ग्रामस्थांचा सवाल सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश असताना ९० दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही अहवाल न आल्याने चौकशी प्रक्रियेलाच विलंब लावला जात आहे का? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. चौकशी अहवाल रखडल्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारातील पारदर्शकतेबाबतही नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. संबंधित तक्रारीची चौकशी नेमकी कुठपर्यंत पोहोचली, अहवाल सादर करण्यास विलंब का झाला आणि त्यासाठी जबाबदार कोण, याबाबत प्रशासनाने स्पष्टता द्यावी, अशी मागणी होत आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर येथील उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी करावी.

# भंडारा शहरात भरदिवसा नववीतील विद्यार्थ्याची हत्या!

## नेहरू गार्डनजवळ धारदार हत्याराने हल्ला

जन सम्राट टाईम्स

**भंडारा| प्रतिनिधी:** भंडारा शहरात भरदिवसा एका अल्पवयीन शाळकरी विद्यार्थ्याची धारदार हत्याराने वार करून हत्या झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. मंगळवारी (१८ ऑगस्ट) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास मेंढा परिसरातील नेहरू गार्डनजवळ ही घटना घडली. या घटनेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मृत विद्यार्थ्याचे नाव अंशु येरकडे (वय १६) असे असून तो भगीरथ भास्कर शाळेत नववीच्या वर्गात शिक्षण घेत होता. शाळा सुटल्यानंतर घरी जात असताना त्याच्यावर हल्ला करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.

गंभीर वार झाल्याने अंशुचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनास्थळी त्याची शाळेची बॅग आढळून आली. जुन्या वादातून हल्ला झाल्याचा प्राथमिक संशय प्राथमिक माहितीनुसार, अंशु आणि संशयित मुलगा एकमेकांच्या परिचयाचे होते. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये वाद झाला होता. मंगळवारी दोघांची पुन्हा भेट झाली असता जुन्या वादातून त्यांच्यात बाचाबाची झाली. त्यानंतर वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. याचदरम्यान संशयित मुलाने धारदार हत्याराने अंशुवर वार केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. संशयित आरोपीही अल्पवयीन असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, त्येमागील नेमके कारण आणि घटनेचा संपूर्ण क्रम पोलिसांच्या तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

घटनास्थळी पोलिसांची धाव घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. परिसरातील परिस्थितीची पाहणी करून तपास सुरू करण्यात आला आहे. हत्येमागील कारण, आरोपीची भूमिका आणि घटनेशी संबंधित इतर बाबींचा पोलीस तपास करीत आहेत. शहरातील वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिक चिंतेत भंडारा शहरात अलीकडच्या काळात घडलेल्या गंभीर घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.

काही दिवसांपूर्वी विघ्नहर्ता हॉटेलसमोर भरदिवसा एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली होती. त्यापूर्वी साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवरील अत्याचाराच्या घटनेनेही शहर हादरले होते. या घटनांची चर्चा सुरू असतानाच आता शाळेत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्याची भरदिवसा हत्या झाल्याने नागरिकांकडून कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी अधिक प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास भंडारा पोलीस करीत असून हत्येचे नेमके कारण आणि घटनेमागील संपूर्ण सत्य तपासातून समोर येणार आहे.

# उशिरा पेरणीनंतर आता पावसाची ओढ, शेतकरी चिंतेत!

## जामखेड तालुक्यात पिकांची वाढ खुंटली; सोयाबीन, मूग पिवळे पडण्यास सुरुवात

जन सम्राट टाईम्स



**अहिल्यानगर |प्रतिनिधी:** बापुसाहेब घोडेस्वार : यंदा मान्सूनचा पाऊस वेळेवर आणि समाधानकारक न झाल्याने जामखेड तालुक्यातील खरीप हंगाम अडचणीत सापडला आहे. पावसाअभावी खरिपाच्या पेरण्या तब्बल १५ ते २० दिवस उशिरा झाल्यानंतर कसाबसा पेरणीचा टप्पा पूर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता पिके वाढीच्या अवस्थेत असतानाच पावसाने पुन्हा दडी मारल्याने नवे संकट उभे ठाकले आहे. जामखेड तालुक्यात प्रामुख्याने सोयाबीन, बाजरी, मूग, तूर आणि उडीद या पिकांची मोठ्या प्रमाणावर पेरणी करण्यात आली आहे. जून आणि जुलै महिन्यात पावसाचे प्रमाण कमी आणि अनियमित राहिल्याने पेरण्यांना मोठा विलंब झाला. त्यानंतर जुलैच्या उत्तरार्धात झालेल्या अल्प पावसाच्या आधारावर अनेक शेतकऱ्यांनी कोरडी-ओली पेरणी उरकली.- पेरणीनंतर पिकांची उगवण झाली असली तरी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून पावसाने मोठी उघडीप दिल्याने पिकांची वाढ खुंटली आहे. कडक ऊन आणि जमिनीतील कमी होत चाललेल्या ओलाव्यामुळे अनेक भागांतील पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. विशेषतः सोयाबीन आणि मूग पिकांना सध्या पाण्याची मोठी गरज आहे. मात्र, शेतातील ओलावा संपत चालल्याने काही ठिकाणी पिके पिवळी पडू लागली आहेत. आगामी काही दिवसांत दमदार पाऊस न झाल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांना दुबार पेरणीच्या संकटालाही सामोरे जावे लागू शकते. तालुक्यातील अनेक भागांतील विहिरी आणि कूपनलिकांच्या पाणीपातळीत अद्याप अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे पिकांना संरक्षित सिंचन देणेही शेतकऱ्यांसाठी कठीण झाले आहे. पावसाअभावी खरीप पिके वाचविण्यासाठी उपलब्ध पाण्याचा वापर करण्याचीही मर्यादा निर्माण झाली आहे. सुरुवातीला पावसाने दिलेली हुलकावणी आणि त्यानंतर पडलेली प्रदीर्घ उघडीप यामुळे जामखेड तालुक्यातील शेतकरी पुरता हवालदिल झाला आहे. मोठ्या कष्टाने आणि वाढत्या खर्चातून केलेल्या पेरणीनंतर आता पिकांचे भवितव्य पावसावर अवलंबून राहिले आहे.

### ऑगस्टमध्ये पावसाने दिली हुलकावणी

पेरणीनंतर पिकांची उगवण झाली असली तरी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून पावसाने मोठी उघडीप दिल्याने पिकांची वाढ खुंटली आहे. कडक ऊन आणि जमिनीतील कमी होत चाललेल्या ओलाव्यामुळे अनेक भागांतील पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. विशेषतः सोयाबीन आणि मूग पिकांना सध्या पाण्याची मोठी गरज आहे. मात्र, शेतातील ओलावा संपत चालल्याने काही ठिकाणी पिके पिवळी पडू लागली आहेत. आगामी काही दिवसांत दमदार पाऊस न झाल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांना दुबार पेरणीच्या संकटालाही सामोरे जावे लागू शकते.

# पोखरांतर्गत योजनांचा लाभ घेत 96 हजार शेतकऱ्यांनी बदलले शेतीचे चित्र

अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोखरा) योजनेचा पहिला टप्पा समाप्त झाला आहे. या पहिल्या टप्प्यात जालना जिल्ह्यातील दहा वीस नव्हे तब्बल ९६ हजार शेतकऱ्यांनी विविध योजनांचा लाभ घेत शेतीचे चित्र बदलले आहे.यासाठी शासनाच्या वतीने तब्बल ७८६ कोटींचा निधीही खर्च करण्यात आला आहे. याद्वारे शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होण्यास मदत होत असून, लवकरच पोखराचा दुसरा टप्पाही सुरू केला जाणार आहे. २०१८ साली पोखरांतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी शासनाकडून सुरू करण्यात आली होती. योजनेच्या माध्यमातून शेतीपयोगी साधने आणि साहित्य योजनांचा लाभ देण्यात आला आहे. जून महिन्यात योजनेचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून, यामध्ये जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेडनेट हाउस, ठिंबक सिंचन, तुषार सिंचन, फळबाग लागवड, शेततळे, मत्स्यपालन, नवीन विहीर, पंप संच, पाइप, पॉली टनेल, हरितगृह, शेडनेट हाउसमधील लागवड साहित्य, पॉली हाऊस, गांडूळ खतनिर्मिती, बंदिस्त शेळीपालन, बीजोत्पादन, मधुमक्षिकापालन, रुंद वाफा व सरी तंत्रज्ञान अवलंबण्यास प्रोत्साहन, रेशीम उद्योग, विहीर पुनर्भरण, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे अस्तरीकरण व इतर योजनांचा लाभ घेतला आहे. योजनेत शासनाने ७६८ कोटी १९ लाख रुपये इतके अनुदान वाटप केले आहे.अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेली नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोखरा) योजनेचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे.



शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी शासनाच्या वतीने जिल्ह्यात पोखरांतर्गत विविध योजना राबविण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ३६३ गावांतील शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला आहे. त्याद्वारे विविध कामे शेतीत झाली असून, शेतकऱ्यांना सक्षम होण्यास त्याची मदत होत आहे. - जी. आर. कापसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी.

नवीन विहीर, शेततळ्यामुळे पाण्याची उपलब्धता पोखरांतर्गत नवीन विहीर, शेततळ्यांची योजनाही राबविण्यात आली आहे. याचा जवळपास तीन हजारावर शेतकऱ्यांनी लाभ घेतला आहे. त्यामुळे संबंधितांना शेतीसाठी पाण्याची उपलब्धता झाली आहे.

याच योजनेंतर्गत ठिबक, तुषारचाही लाभ शेतकऱ्यांनी घेतला असून, कमी पाण्यात अधिक उत्पन्न घेण्यास त्यामुळे मदत झाली आहे. विविध घटक योजनांद्वारे शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

दुसरा टप्पा कधी सुरू होणार अशी शेतकऱ्यांकडून विचार होत आहे. बजेट प्राप्त होताच दुसरा टप्पा लवकरच सुरू होणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगितले जात आहे.

| | | |
|---|---|---|
| शेडनेट हाऊस | ३२४७ | २६६.४३ |
| ठिबक सिंचन | ३८५८३ | ३०९.६३ |
| तुषार सिंचन | २१७७७ | ४०.१२ |
| फळबाग लागवड | १७९१४ | ६१.११ |
| शेततळे | २८७८ | ६१.०१ |
| मत्स्यपालन | १२९२ | ३.२९ |
| नवीन विहीर | २५८ | ६.२४ |
| पंप संच | ३०५५ | ४.४९ |
| पाइप | २४३३ | ४.७३ |
| पॉली टनेल | ११ | १.१८ |
| गांडूळ खतनिर्मिती | ३२ | ०.०२ |
| बिजोत्पादन | ७६० | ०.६९ |
| रेशीम उद्योग | १०१० | ७.१९ |
| विहीर पुनर्भरण | २७ | ०.०३ |
| कृषी यांत्रिकीकरण | ५९१ | ४.५ |
| इतर | १७ | ०.९४ |

# राज्यातील महिलांना मिळणार वर्षाला तीन गॅस सिलेंडर

मुंबई : केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या राज्यातील सुमारे ५२.१६ लाख लाभार्थ्यांना तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबाना वर्षाला ३ गॅस सिलिंडरचे पुनर्भरण मोफत उपलब्ध करून देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे व तसा शासन निर्णय केला आहे.

या योजनेचे पात्रता निकष

- या योजनेचा लाभ मिळण्यासाठी गॅस जोडणी महिलेच्या नावाने असणे आवश्यक आहे.
- राज्यातील प्रधानमंत्री उज्वला योजनेंतर्गत पात्र असलेले लाभार्थी या योजनेसाठी पात्र असणार आहेत.
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पात्र असलेल्या लाभार्थ्यांचे कुटुंब या योजनेस पात्र असणार आहे.
- एका कुटुंबात शिधापत्रिकेनुसार केवळ एक लाभार्थी या योजनेस पात्र असेल.
- तसेच फक्त १४.२ किलेग्रॅम वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅस ग्राहकांना ही योजना लागू असेल.

या योजनेची कार्यपद्धती

- प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना गॅस सिलिंडरचे नियमित वितरण हे तेल कंपन्यांमार्फत करण्यात येते. “मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना” अंतर्गत द्यावयाच्या 3 मोफत गॅस सिलिंडलचे वितरणही तेल कंपन्यामार्फत करण्यात येईल.
- केंद्र सरकारच्या ३०० रुपये अनुदाना व्यतिरिक्त राज्य शासन ५३० रुपये प्रति सिलिंडर इतकी रक्कम लाभार्थ्यांचा थेट बँक खात्यात जमा करण्यात येईल.
- तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थी यांना प्रति सिलिंडर ८३० रुपये रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे बँक खात्यात जमा करण्यात येईल.
- या योजनेत ग्राहकास एका महिन्यास एकापेक्षा जास्त सिलिंडरसाठी अनुदान देण्यात येणार नाही.
- दि. १ जुलै २०२४ रोजी पात्र होणाऱ्या लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ देण्यात येईल.
- दि. १ जुलै २०२४ नंतर विभक्त केलेल्या शिधापत्रिका या योजनेस पात्र ठरणार नाहीत.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी व लाभार्थी निवडीसाठी मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी एक, प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे शहरासाठी नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती असेल, तर संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती कार्यरत असेल.

या दोन्ही समिती ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेच्या लाभार्थ्यांचे (रेशन कार्डनुसार) कुटुंब निश्चित करेल. योजनेतील लाभार्थ्यांची द्विरुक्ती होणार नाही याची काळजी घेईल. निकषांची पूर्तता करणाऱ्या लाभार्थ्यांची आधार प्रमाणित अंतिम यादी, आधार संलग्न बँकखाते क्रमांकासह निश्चित करेल. याशिवाय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी व ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी राज्यस्तरीय समितीही कार्यरत असणार आहे.



# धान्य वितरण बंद : गरिबांच्या धान्याची काळजी कुणाला ?

भंडारा : ई-पॉस मशीनमध्ये गत दोन महिन्यांपासून सर्व्हर डाऊनची समस्या उद्भवत आहे. त्यावर अजूनही तोडगा निघाला नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे रेशन लाभार्थ्यांना धान्य वितरण करताना अडचणी येत आहे. वितरण बंद असल्याने लाभार्थ्यांना स्वस्त धान्य दुकानांवर हेलपाटे मारावे लागत आहे. त्यामुळे गरिबांच्या धान्याची काळजी कोणाला, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

स्वस्त धान्य दुकानातील वितरण व्यवस्था ठप्प पडली आहे. आता प्रशासनाने ऑफलाइन धान्य वितरण करण्याच्या सूचना दुकानदारांना दिल्या असल्या तरी ऑनलाइनचा तगादा स्वस्त धान्य दुकानदारांना दिल्याने त्यांच्या द्विधा मनस्थिती आहे. भंडारा जिल्ह्यात एकूण ८९० रेशन दुकाने आहेत. या दुकानांअंतर्गत २ लाख ४८ हजार ३३५ कार्डधारक आहेत. या माध्यमातून जिल्ह्यात एकूण १० लाख ४ हजार ८९ लाभार्थी संख्या आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर मजुरी बुडवून दुकानांसमोर रांगेत उभे राहून धान्य घेत असतात. मात्र तासनतास उभे राहूनही ई- पॉस मशीन सर्व्हर डाऊन झाल्याने सुरू होत नाही. त्यामुळे कंटाळून ग्राहकांना परत जावे लागत आहे. याबाबत रेशन दुकानदारांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसीलदार यांना पत्र देऊन अवगत केले आहे. परंतु यावर तोडगा निघाला नाही. त्यामुळे मशीन तहसील कार्यालयात जमा करण्याचा निर्णय स्वस्त धान्य दुकानदारांनी घेतला आहे.

जिल्ह्यातील ८९० रेशन दुकानदारांना पुरवठा विभागाकडून ई-पॉस मशीन दिल्या आहेत. या मशीनवर लाभार्थीची बायोमेट्रिक ओळख पटवून धान्याचे वितरण केले जाते. मात्र रेंजची अडचण, कधी मशीन चालत नाही तर, कधी लाभार्थीच्या बायोमेट्रिक ओळखीत अडथळा निर्माण होतो. नव्या तंत्रज्ञानामुळे सुरुवातीपासूनच लाभार्थ्यांना समस्यांना सामना करावा लागत आहे.

यासंदर्भात जिल्हा अन्न पुरवठा विभागाच्यावतीने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी जुलैचे वितरण करण्यासाठी कैरी फारवर्डची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

दुकानदारांनी ऑनलाईन वाटप पूर्ण करून घ्यावे, शुक्रवारी दुपारनंतर ही प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

ऑफलाइनचे आदेश पण वितरण किचकट अडचणी लक्षात घेऊन आता प्रशासनाने ऑफलाइन धान्य वितरण करण्याच्या सूचना



दुकानदारांना दिल्या आहेत. माव ऑफलाइन वितरण केल्यानंतर दुकानदारांना ऑनलाइन प्रक्रिया राबवायची असल्याने ही प्रक्रिया किचकट आहे. त्यामुळे दुकानदार अडचणीत येण्याची शंका दुकानदारांनी व्यक्त केली.

कॅरी फॉरवर्ड पुन्हा सुरू करा

जुलै महिन्यात धान्य वितरण प्रक्रिया रखडल्याने जुलै महिन्याचे धान्य ऑगस्ट महिन्यात वितरित करावे. जुलै व ऑगस्ट असे दोन्ही महिन्यांचे धान्य कॅरी फॉरवर्ड करून लाभार्थ्यांना त्याचे वितरण करावे, अशी मागणी स्वस्त धान्य दुकानदारांसह लाभार्थ्यांनी केली आहे. याकडे प्रशासनाला लक्ष देण्याची गरज आहे.

जिल्ह्यात दरमहा वितरणासाठी ६२ हजार ७० विचेटल धान्याची मागणी केली जाते. जिल्ह्यातील ग्राहक संख्या व रेशन दुकानांची संख्या लक्षात घेता शासनाकडून धान्यांची मागणी केली जाते. गहू अंत्योदय लाभार्थीसाठी ६ हजार ६७० क्विटल तर, प्राधान्य कॉर्डधारकांसाठी ७ हजार ७५० विचेटल, असे एकूण १४४२० क्विंटल, तसेच तांदूळ अंत्योदय लाभार्थ्यांसाठी १६ हजार ६९० विचेटल व प्राधान्य लाभाथ्यांसाठी ३० हजार ९६० क्विंटलची मागणी केली जाते.

## काय आहे कारण?

गत आठवड्याभरापासून राज्यात पावसाचा कहर सुरु आहे. या पावसामुळे आधार सिडींग होण्यास अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे पॉस मशीनमध्ये तांत्रीक अडचण आली आहे. यामुळे वितरणावर परिणाम दिसून येत आहे.

## ग्राहकांची भूमिका

ई-पॉस मशीनीतील बिघाडाने स्वस्त दुकानदार परत पाठवीत आहेत, चार पाच चकरा मारून झाल्यामुळे आता कंटाळा आला आहे. परिणामी दुकानदारांसोबत वाद होत आहे. सर्व उपस्थित लाभाथ्यापैकी बोटावर मोजण्याइतकेच लाभार्थीचे ठसे लागतात. नंतर प्रक्रीया उप्प पडते.

# स्वाधार योजनेसाठी पोर्टल सुरु, ऑनलाईन अर्ज करता येणार

नागपूर : अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा करण्यात येते. या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ मध्ये स्वाधार योजनेचा HTTPS://HMAS. MAHAIT.ORG या पोर्टलद्वारे नागपूर जिल्ह्यात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी हे संकेतस्थळ सुरु करण्यात आले असून अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करुन सदर अर्जाची प्रत सहाय्यक आयुक्त. समाज कल्याण, नागपूर येथे सादर करण्यात यावे, असे जाहिर आवाहन सुकेशिनी तेलगोटे, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, नागपूर हे करीत आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भावन शासकीय आय. टी. आय समोर, श्रध्दानंद पेठ, दीक्षाभूमी चौक, नागपूर येथे संपर्क साधावा.

## स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी निकष

या योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध या प्रवर्गाचा असावा. विद्यार्थ्याने जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज केलेल्या व प्रवेश न ६ मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांचा या योजनेच्या निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल. विद्यार्थ्याने स्वतःचा आधार क्रमांक त्याने ज्या राष्ट्रीयकृत शेडयूल्ड बँकेत खाते उघडले आहे त्या खात्याशी संलग्न करणे बंधनकारक असेल. विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न २.५० लाखापेक्षा जास्त नसावे. महानगरपालिकेच्या हद्दीपासून ०५. किमी. परिसरात असलेल्या महाविद्यालयात, शिक्षण संस्थेत शिकत असलेले विद्यार्थी या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र असतील.

विद्यार्थी इयत्ता अकरावी, बारावी आणि त्यानंतरचे उच्च शिक्षण घेणारा असावा. इयत्ता दहावी व बारावी मध्ये किमान ५० टक्के गुण असणे अनिवार्य आहे.

# टेलर, गवंड्यांना नाही मिळणार १५ हजार रुपयांचे साधन किट !

गडचिरोली : सर्वसामान्य नागरिकांना पाठबळ देण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आहेत. पंतप्रधान विश्वकर्मा योजना समाजातील विविध १८ व्यवसाय करणाऱ्या लोकांना त्यांचा पारंपरिक व्यवसाय करताना अर्थसाहाय्य व्हावे यासाठी राबविली जात आहे; परंतु टेलर आणि गवंडी लाभार्थ्यांना प्रशिक्षण काळात प्रतिदिन ५०० रुपयांचे विद्यावेतन, प्रमाणपत्र आणि साधने घेण्यासाठी १५ हजार रुपयांचा लाभ देण्यास स्थगिती दिली आहे.

पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ घेण्यासाठी, अर्जदारांना श्रमिक पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा लागतो. अर्जदारांच्या त्रिस्तरीय पडताळणीनंतर त्यांना योजनेचा लाभ दिला जातो. ग्रामीण आणि शहरी संस्थांसाठी पडताळणीसाठी स्वतंत्र यंत्रणा आहेत. ग्रामीण भागात पडताळणीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडे आली आहे. त्यामुळे शहरी भागात प्रथम स्तरावरील पडताळणी कार्यकारी अधिकारी करतात.

## पीएम विश्वकर्मा योजना

समाजातील पारंपरिक व्यवसाय करण्यासाठी सुरु केलेली आहे. या योजनेंतर्गत समाजातील सर्व जातींना प्रशिक्षणासह कर्ज कमी व्याजदरात उपलब्ध करून देण्यात येत आहे. दोन टप्प्यात दिले जाते कर्ज स्वतःचा रोजगार निर्माण करण्यासाठी बँकांमार्फत एक लाख ते तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज हमीशिवाय दिले जाते. यावर ५ टक्के व्याज असून, तीन लाख रुपयांची ही रक्कम एक लाख व दोन लाख अशा दोन टप्प्यांत दिली जाते.



## निवडीचे निकष काय?

अर्ज करणाऱ्या व्यक्तीकडे त्याचे जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ फक्त भारतीय नागरिकांनाच मिळणार आहे. अर्ज करणारी व्यक्ती एकतर कुशल कारागीर किंवा कारागीर असणे आवश्यक आहे.

गवंडी, टेलरला स्थगिती

गवंडी कामे व टेलरची कामे करणारी व्यक्ती ही आधीच प्रशिक्षित असते. त्यामुळे या व्यक्तींना प्रशिक्षण देणे व साहित्य खरेदीसाठी लाभ देण्यास सध्या स्थगिती आहे.

## लाभ काय?

प्रतिदिन ५०० रुपये विद्यावेतन या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना एक आठवड्यापर्यंत मोफत प्रशिक्षण दिले जाते. याकरिता त्यांना ५०० रुपये प्रतिदिन विद्यावेतन दिले जाते.

## प्रमाणपत्र

संबंधित लाभार्थ्यांना एक आठवड्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रशिक्षण प्रमाणपत्र दिले जाते. परंतु, आता टेलर व गवंडी यांना हे प्रमाणपत्र देण्यावर स्थगिती आलेली आहे.

## व्यवसाय साधन खरेदीसाठी १५ हजार

लाभार्थ्याने प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याला त्याच्या पारंपरिक व्यवसायासाठी साधने, किट खरेदी करण्यासाठी १५ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य दिले जाते.

अधिकारी म्हणतात..

"पीएम विश्वकर्मा योजनेंतर्गत टेलर व गवंडी यांना प्रशिक्षण काळात विद्यावेतन, प्रमाणपत्र आणि साधने खरेदीसाठी लाभ देण्याबाबत स्थगिती आल्याचे निर्देश शासनाकडून प्राप्त झाले नाही, असे नगर परिषदेतील एका अधिकाऱ्याने सांगितले".